# पंडिता रमाबाई - तेजस्वी स्त्री



**सौ. दीपश्री दीपक जोशी,** कोल्हापूर
माजी कार्यवाह, कऱ्हाडे ब्राह्मण संघ
भ्रमणध्वनी : ७५८८२२५३२२

एकोणिसाव्या शतकात उत्तरार्धात बंगालमध्ये कांही पुरोगामी मताचे समाजधुरीण स्त्री उध्दाराचे व अंधश्रध्दा निर्मूलनाचे कार्य करीत होते. त्याचवेळी म्हणजे १८७८ मध्ये वीस वर्षांची एक युवती आपल्या वडील भावासह कलकत्त्यास आली. दोघेही अनवाणी होते. अंगावर फाटकी वस्त्रे होती. बऱ्याच दिवसांची उपाशीही असावीत. पण त्यांच्या चेहऱ्यावर ज्ञानाची व बुध्दीची झळाळी विलसत होती. कलकत्यामधील पंडितांच्या सभेत तिने पुराणातील अठरा हजार संस्कृत श्लोक धडाधड म्हणून दाखवले. व्याकरण शास्त्रामधील आपले नैपुण्य सिध्द केले. ज्या काळात स्त्री ला शिक्षण द्यावे की नाही यांवर नुसता खल चालला होता, त्या काळात या युवतीचे संस्कृत ज्ञान व प्रगाढ पांडित्य पाहून कलकत्यातील विद्वान पंडितांना खूप आनंद झाला. त्यांनी तिला पंडिता रमाबाई सरस्वती ही पदवी सभेमध्ये बहाल केली.

रमाबाईंचा जन्म वेदशास्त्र संपन्न डोंगरे कुलातला. वडील अनंतशास्त्री डोंगरे विद्यासंपन्न व त्या काळातही प्रागतिक विचारसरणीचे मुलीचे लग्न ती २० ते २१ वर्षाची झाल्याशिवाय करायचे नाही. या ठाम विचाराचे. त्यांनी बायकोला संस्कृत शिक्षण दिले. पण त्यांच्या या कट्टर विचारामुळे त्यांना स्वतःच्या राहत्या घराचाही त्याग करावा लागला ते मालहेरंजी सोडून गंगामूळला रहायला आले. तेथेच २३ एप्रिल, १८५८ रोजी रमाबाईंचा जन्म झाला.

छोटी रमा सहा महिन्यांची असतांना अनंतशास्त्रींना पुन्हा गंगामूळ सोडावे लागले व पुढे २० वर्षेपर्यंत अखंड भटकंती रमेच्या नशिबी आली. रमेची आई लक्ष्मीबाई डोंगरे यांनी रमेचे शिक्षण घरीच सुरू ठेवले. कुशाग्र बुध्दीची रमा मिळेल ते ज्ञान आत्मसात करू लागली. संस्कृत शिकू लागली. नकली दागिन्यांपेक्षा अंगचे गुणच स्त्रीला शोभा आणतात व तेच खरे विव्दान असतात. लक्ष्मीबाई डोंगरेची ही शिकवण रमाबाईंना जन्मभर मार्गदर्शक ठरली.

रमाबाईंची बालपणीची कांहीच वर्षे आनंदात गेली. नंतर मात्र त्यांना अतोनात हालपेष्टा सहन कराव्या लागल्या. १८७४ मध्ये पाठोपाठ वडील, आई व मोठी बहीण यांचा मृत्यू झाला. रमा व भाऊ श्रीनिवास यांनी पुढील चार वर्षे खूपच कष्टात काढली. मद्रास ते कन्याकुमारी हा चार हजार किलोमीटरचा प्रवास या भावंडांनी पायी, अनवाणी व उपाशी पोटी कसा केला असेल ते परमेश्वरच जाणे !

कलकत्याला मात्र त्यांच्या पांडित्याची कदर झाली. जीवनात थोडी स्थिरता आली. तेथेही त्या स्वस्थ बसल्या नाहीत. स्त्रियांच्या करूण स्थितीबद्दल लोकजागृती करण्याचे काम त्यांनी हाती घेतले. २० वर्षांच्या भटकंतीमध्ये पाहिलेली देशातील स्त्री, विशेषतः बालविधवांची दुःखे, त्यांचा छळ त्यांनी डोळ्याने पाहिला होता. हिंदू धर्मातील अन्यायी तत्वामुळे विधवा स्त्रियांना आनंदी राहण्याचा वा जगण्याचा अधिकार नव्हता. तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणची धर्ममार्तंडांची भोंदुगिरी पाहून तरी त्यांचा हिंदू धर्मावरील विश्वास उडाला होता.

स्त्री उन्नतीच्या कार्यासाठी त्यांनी स्वतःला वाहून घेतले. पण वडील भावाच्या मृत्यूमुळे त्या पुन्हा एकाकी झाल्या. यावेळी त्यांना आधार मिळाला तो कलकत्यामधील पुरोगामी विचारांचे विव्दान बिपीनबाबू बिहारीदास मेधावी,

यांचा १३ जून, १८८० ला रजिस्टर पध्दतीने त्यांचा विवाह बिपीनबाबू यांच्याशी झाला. हा प्रतिलोभ विवाह होता. पण बाई उच्चनीचता मानीत नसत. या विवाहाने त्यांच्या दुःखी जीवनात थोडेसे आनंदाचे क्षण आले. याकाळात त्यांनी खूप वाचन केले. बायबलचे ही वाचन केले. बायबलमधील परोपकारी वृत्ती व दयाळूपणा त्यांना विशेष आवडला. एप्रिल, १८८१ मध्ये मनोरमेच्या रूपाने त्यांना कन्यारत्नाचा लाभ झाला. पण पुढे दहा महिन्यांतच पतीचा आकस्मिक मृत्यू झाला. ऐन तारूण्यात वैधव्याचा घाला पडला. हिंदू स्त्रीसाठी वैधव्य हे क्लेशकारकच. पण बाईंनी याचासुध्दा आपल्या व इतरांच्या उन्नतीसाठी उपयोग करून घेतला.

अचानक आलेल्या वैधव्यामुळे रमाबाईंना कलकत्त्याला एकाकी वाटू लागले. महाराष्ट्रातील विद्वानांनी देखील रमाबाईंना महाराष्ट्रात बोलावले होतेच. बाईंनी या आमंत्रणाचा स्वीकार केला व महाराष्ट्रात येण्याचे ठरवले. त्यावेळी बाईंच्याजवळ काय होते ? कोणते बळ होते ? त्यांच्याजवळ होती, वडीलांनी दिलेली शिक्षणाची आवड, स्त्री उध्दाराची तळमळ, आईचे सुसंस्कार, भावाने दिलेली परमेश्वरावरील निष्ठा व पतीने दिलेली पुरोगामी दृष्टी. या शिदोरीवरच त्यांनी पुढील जीवनाची वाटचाल केली. त्या आपल्या मुलीसह महाराष्ट्रात आल्या. पुण्यामध्ये बिनबोभाटी सभेत स्त्रियांच्या उध्दारांची व स्त्री शिक्षणाची गरज ठामपणे सर्वांच्या समोर मांडली. शिक्षणाने स्त्री सुधारते. सुशिक्षीत व सुसंस्कारित स्त्रीमुळेच एकंदर देश सुधारतो. हा त्यांचा विचारांचा मूळ गाभा होता. त्यांचे गोड बोलणे, भाषणाची उत्तम शैली, ठाम विचार, ठासून सांगण्याची त्यांची वृत्ती यामुळे विरोधकांच्यावरही त्यांची अचूक छाप पडत असे. १ मे, १८८३ मध्ये या बिनबोभाटी सभेचे आर्य महिला समाज असे रूपांतर करण्यात आले. बाईंनी महाराष्ट्रभर दौरे काढून लोकजागृती केली. सोलापूर, पंढरपूर, अहमदनगर, ठाणे, मुंबई येथे आर्य महिला समाजाच्या शाखा स्थापन केल्या.

१८८३ मध्ये इंग्रज सरकारने हिंदुस्थानातील शैक्षणिक परिस्थितीची पाहणी करण्यासाठी हंटर कमिशन नेमले. या हंटर कमीशन पुढची रमाबाईंची साक्ष खूप गाजली. बाईंनी १८८१ च्या खानेसुमारीचा दाखला देत स्त्री शिक्षणाची दारूण अवस्था कमीशनरच्या नजरेसमोर आणली. स्त्रीचे जीवन सुधारण्यासाठी प्रशिक्षित शिक्षिका नेमाव्यात, स्त्रियांना इंग्रजी शिक्षण द्यावे, वैद्यकीय शिक्षण द्यावे, स्त्री डॉक्टरांची संख्या वाढवावी या व अशा अनेक सूचना हंटर कमीशनला केल्या. या त्यांच्या साक्षीमुळेच व्हिक्टोरिया राणीने भारतात स्त्रियांच्या वैद्यकीय शिक्षणाला चालना दिली. १८८५ मध्ये स्त्रियांसाठी खास असे दवाखाने इंग्रज सरकारने सुरू केले. या त्यांच्या कृतीमुळेच परदेशातही त्यांची किर्ती पसरली.

विधवांच्या पुनर्वसनासाठी बाईंनी भारतातील पुरोगामी व्यक्तींच्याकडे मदत मागितली. पण त्यांना सर्वांकडून नकारच मिळाला. म्हणून त्यांनी शिक्षणासाठी इंग्लंडला जाण्याचे ठरवले. स्वाभिमानी बाईंनी प्रवास व तिथल्या राहण्याचा व शिक्षणाचा खर्च स्वतः केला. यासाठी कोणाकडूनही एक पैची मदत त्यांनी घेतली नाही. इंग्लंडमधील वास्तव्यामध्ये स्त्रियांच्या पुनर्वसनाचे काम पाहून त्या खूपच प्रभावित झाल्या.

नंतर त्या डॉ. रचेल बॉडेल यांच्या आग्रहावरून अमेरिकेत गेल्या. तेथील प्री-प्रायमरी स्कूलींग पध्दतीचा अभ्यास केला. कारण भारतातील बालविधवांना शिक्षीत करण्यासाठी त्याचा फार मोठा उपयोग होणार होता. अमेरिकेत सभा संमेलानातून भाषणे करून त्यांनी हिंदुस्थानातील स्त्रियांच्याबद्दल सहानुभूती निर्माण केली. त्याचे फलीत म्हणून की काय रमाबाईंच्या कार्याच्या मदतीसाठी अमेरिकेत रमाबाई असोसिएशन स्थापन झाली. अशाप्रकारे अलोट पैसा व भक्कम पाठबळ मिळवून बाई फेब्रुवारी १८८९ मध्ये भारतात परत आल्या.

अकरा मार्च, १८८९ मध्ये मुंबईमध्ये शारदा सदन ची

स्थापना केली. त्याठिकाणी विधवांना सन्मानाने राहता येऊ लागले. त्यांना याठिकाणी केस वाढवण्याची मुभा मिळाली. रमाबाईंच्या रूपाने त्यांना आईचे प्रेम मिळाले. या शारदा सदनामध्ये धार्मिक स्वातंत्र्य होते. पण तिथल्या वातावरणाने भारावून कांही जण बाप्तिस्मा घेत. त्यामुळेच शारदा सदनामध्ये ख्रिस्तीकरण होते अशी टीका पुरोगामीसुध्दा करू लागले. या टीकेला रमाबाईंनी असे उत्तर दिले कीं, हिंदू लोक स्त्री शिक्षणासाठी पैसा देईनात, म्हणून मी ख्रिस्ती लोकांकडे मदत मागितली. शारदा सदन चालवणार असाल तर मी अडथळा आणणार नाही. एक ख्रिस्ती म्हणून तुम्हांला मदतच करेन. या चोख प्रत्युतराने टीकाकारांची तोंडे बंद झाली.

सरकारच्या संमती वयाच्या बिलाच्या वादामध्ये स्त्रियांची बाजू बाईंनी जोरदारपणे मांडली. राष्ट्रीय सभेच्या कामकाजात स्त्रियांना सहभाग घेण्यास प्रवृत्त केले. आजची राष्ट्रीय सभा ही उद्याच्या स्वतंत्र भारताची पार्लमेंट असेल. तेंव्हा आताच स्त्रियांचा तेथे शिरकाव झाला तर उद्याच्या स्वतंत्र भारताच्या राजकारणात स्त्री महत्वाची ठरू शकेल या दूरदर्शी विचाराने त्यांनी स्त्रियांना राष्ट्रीय सभेमध्ये प्रतिनिधीत्व करायला लावले. काँग्रेसच्या ५ व्या अधिवेशनात केशवपनाविरूध्दचा ठराव मंजूर करून घेतला. अमेरिकेतील रमाबाई असोसिएशन भारतातील शारदा सदन साठी १० वर्षेच मदत करणार होते. त्यामुळे पुढे भारतातील श्रीमंतांच्याकडून मदत घेण्याचा प्रयत्न रमाबाईंनी केला. पण त्यांत अपयश आले. त्यामुळे त्या पुन्हा अमेरिकेला गेल्या व यावेळी पूर्वीपेक्षा ही भरघोस सहाय्य घेऊन भारतात परत आल्या.

शारदा सदनासाठी केडगांव येथे एक जागा घेतली. त्याचवेळी मध्यप्रांत व गुजराथ येथे मोठा दुष्काळ पडला. त्यांना मदतीचा हात देण्यासाठी रमाबाई तिकडे गेल्या. दुष्काळाने होरपळलेल्या, अश्राप फसवल्या गेलेल्या, वाईट सवयी लागलेल्या मुलींचे पुनर्वसन त्यांनी केले. त्यासाठी शारदा सदन अपुरे पडू लागले. म्हणून केडगांवच्या मोठ्या जागेत शारदा सदन हलवावे लागले. तिथेच त्यांच्या कार्याचा खूप विस्तार झाला.

रमाबाईंची मुलगी मनोरमा हिने ही आपल्या आईचा वारसा पुढे चालवला. ऑस्ट्रेलिया व न्युझीलंड येथे प्रार्थनास्थळे उघडली. कडेगांव गुलबर्गा येथे अंधशाळा काढल्या. मनोरमाबाईंनी रमाबाईंची खूपशी जबाबदारी कमी केली. पण मनोरमेच्या अचानक मृत्यूमुळे रमाबाईंच्या जीवनात पुन्हा पोकळी निर्माण झाली. पण रमाबाईंनी मोठ्या धीराने व आपल्या बाकीच्या विश्वासू सहकाऱ्यांच्या सहाय्याने शारदा सदनाचे काम नेटाने पुढे चालवले. १५ एप्रिल, १९२२ मध्ये रमाबाईंचे निधन झाले. शारदा सदनाला पोरके करून बाई गेल्या. पण आजही हेच शारदा सदन अनेक विधवांचे, परित्यक्तांचे हक्काचे माहेरघर बनले.

रमाबाईंनी आपल्या साहित्यातून दिलेले विचारधन मोलाचे आहे. कारण ते त्यांच्या अनुभवाच्या, अनुभूतीच्या व दूरदृष्टीच्या दृष्टीकोनातून प्रसवले होते. स्त्री धर्मनीति, युनायटेड स्टेटची लोकस्थिती, प्रवास वृत्त, हायफास्ट हिंदू वूमन ही त्यांची साहित्य संपदा. सर्वांत मोलाचे साहित्यिक कार्य म्हणजे त्यांनी बायबलचे केलेले साधे सोपे भाषांतर.

एकूणच रमाबाईंना हिंदू स्त्रियांबद्दल वाटणारी आस्था व येशू वरील गाढ विश्वास, यांमुळेच त्यांनी आपले मानवतावादी कार्य येणाऱ्या संकटांना, होणाऱ्या टीकांना न घाबरता पार पाडण्यात यश मिळवले. ज्याकाळात विधवांना वाली नव्हता, त्याकाळात एका विधवा स्त्रीने कोणतेही आर्थिक, मानसिक पाठबळ नसताना येणाऱ्या संकटांना तोंड देत विधवांना मानाने व आनंदाने जगता यावे म्हणून शारदा सदन सारखा एक दीपस्तंभ विधवांच्या अंधकारमय आयुष्यात उभा केला आहे. एक स्त्री काय करू शकते याचा मूर्तीमंत आदर्श रमाबाईंच्या रूपाने आजच्या स्त्री मुक्ती संघटनेपुढे आहे.

***